॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. ७ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३५१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


✻ सुविचार ✻

फसविण्यात अत्यंत सोपी व्यक्ती म्हणजे आपण स्वतः च होय.

## SPOT NEWS

### साई रिसॉर्ट प्रकरणी अनिल परब यांची निर्दोष मुक्तता

● **मुंबई –** शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा आमदार अनिल परब यांच्यावर भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी गंभीर आरोप केले होते. दापोलीतील साई रिसॉर्ट प्रकरणात जमीन हडप केल्याचा आणि शासनाच्या सीआरझेडच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला होता. मात्र, आता खेड येथील अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाने दापोलीतील साई रिसॉर्ट प्रकरणी अनिल परब यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे अनिल परब यांना दिलासा मिळाला. रत्नागिरी जिल्ह्याच्या दापोली तालुक्यातील मुरुड येथे असलेल्या साई रिसॉर्टशी संबंधित प्रकरणात आरोपींवर सीआरझेड नियमांचे उल्लंघन करून बांधकाम केल्याचा, तसेच खोटी कागदपत्रे सादर केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. मात्र, सुनावणीदरम्यान न्यायालयाने जमीन आणि बांधकाम हे स्वतंत्र घटक असल्याचे निरीक्षण नोंदवत पुराव्यांच्या आधारे सर्व आरोप सिद्ध होत नाहीत, असा निष्कर्ष काढला. त्यामुळे सर्व आरोपींना निर्दोष ठरवत न्यायालयाने त्यांची मुक्तता केली. त्यानंतर अनिल परब यांचे साई रिसॉर्ट प्रकरण बाहेर काढणारे आणि न्यायालयात दावा करणारे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी प्रतिक्रिया देणे टाळले.

### शक्ती कायद्याची तात्काळ अंमलबजावणी करा

● **मुंबई –** काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी राज्यातील महिला व मुलींवरील वाढत्या अत्याचारांप्रकरणी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांना पत्र लिहून राज्यात शक्ती कायद्याची तत्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्राची ओळख प्रगत आणि सुरक्षित राज्य अशी होती. राज्यात पुण्यातील नसरापूर बलात्कार व हत्या प्रकरणामुळे संतापाची लाट उसळली आहे. त्यातच पुण्यात आणखी एका ९ वर्षीय मुलीवर तिच्याच नातेवाइकाने अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्यामुळे या संतापात अधिकच भर पडली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांना पत्र लिहून उपरोक्त मागणी केली आहे.

# ‘वंदे मातरम्’ला राष्ट्रगीतासारखा दर्जा

## केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी । अपमान केल्यास किंवा गायनात अडथळा आणल्यास शिक्षा

● **नवी दिल्ली । वीरभूमी –** केंद्र सरकारने वंदे मातरमला राष्ट्रगीत ‘जन गण मन’ समान दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेल्या वंदे मातरम्वर आता तेच नियम आणि निर्बंध लागू होतील, जे सध्या राष्ट्रगीतावर लागू आहेत. म्हणजेच, त्याचा अपमान केल्यास किंवा त्याच्या गायनात अडथळा आणल्यास शिक्षा होईल. सध्या राष्ट्रीय ध्वज, संविधान आणि राष्ट्रगीताचा अपमान केल्यास तुरुंगवास, दंड किंवा दोन्हीची तरतूद आहे आणि आता वंदे मातरमचाही यात समावेश केला जाईल.

सरकार वंदे मातरम्ला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा बदल करत आहे. यासाठी कायद्याच्या कलम ३ मध्ये सुधारणा केली जाईल. या कलमानुसार, जर एखादी व्यक्ती जाणूनबुजून राष्ट्रगीत गाण्यात अडथळा आणत असेल किंवा त्याला थांबवत असेल, तर त्याला तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. पुन्हा गुन्हा केल्यास किमान एक वर्षाच्या शिक्षेची तरतूद आहे. सुधारणेनंतर हेच नियम वंदे मातरमलाही लागू होतील.



केंद्र सरकारने बुधवारी भारताचे राष्ट्रगीत वंदे मातरम्च्या गायनासाठी अधिकृत प्रोटोकॉलसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. मार्गदर्शक तत्त्वांनुसार, वंदे मातरमची संपूर्ण अधिकृत आवृत्ती, ज्यात सहा श्लोक आहेत आणि ज्याचा कालावधी अंदाजे ३ मिनिटे आणि १० सेकंद आहे, प्रमुख शासकीय समारंभांमध्ये सादर किंवा वाजवली जावी. यामध्ये राष्ट्रध्वज फडकवणे, राष्ट्रपती आणि राज्यपालांच्या अधिकृत कार्यक्रमांमध्ये औपचारिक आगमन आणि प्रस्थान समारंभ आणि अशा समारंभांमध्ये त्यांच्या नियोजित भाषणांपूर्वी आणि नंतरचे कार्यक्रम समाविष्ट आहेत.

जर एखाद्या कार्यक्रमात ‘वंदे मातरम्’ आणि ‘राष्ट्रगीत’ दोन्ही सादर करायचे असतील, तर आधी ‘वंदे मातरम्’ गायले जाईल आणि त्यानंतर ‘राष्ट्रगीत’. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये पुढे हे देखील स्पष्ट केले आहे की, प्रेक्षकांनी आदराचे प्रतीक म्हणून दोन्ही सादरीकरणादरम्यान सावधान स्थितीत उभे राहावे अशी अपेक्षा आहे.

गृह मंत्रालयाने शाळा-महाविद्यालये आणि महत्त्वाच्या संस्थात्मक कार्यक्रमांदरम्यान वंदे मातरम् गाण्याला प्रोत्साहन देण्याचे आवाहनही केले आहे. या उपायाचा उद्देश विद्यार्थी आणि सामान्य जनतेमध्ये राष्ट्रीय प्रतीकांबद्दल जागरूकता आणि आदर वाढवणे हा आहे. हे देखील नमूद केले आहे की जेव्हा वंदे मातरम एखाद्या बँडद्वारे सादर केले जाते, तेव्हा त्यापूर्वी ढोलाच्या थापा किंवा बिगुलच्या आवाजाने औपचारिकपणे गायनाची सुरुवात सूचित केली पाहिजे.

त्याचबरोबर, मंत्रालयाने चित्रपटगृहे आणि चित्रपट प्रदर्शनांसाठी विशिष्ट सूट दिली आहे. निर्देशानुसार, चित्रपटाच्या साउंडट्रॅकचा भाग म्हणून वंदे मातरम् वाजवले गेल्यास प्रेक्षकांना उभे राहण्याची आवश्यकता नाही, कारण मनोरंजन स्थळांमध्ये प्रेक्षकांना उभे राहण्यास भाग पाडल्याने पाहण्याचा अनुभव बाधित होऊ शकतो आणि संभाव्यत: प्रेक्षकांमध्ये गोंधळ निर्माण होऊ शकतो.

## विधानसभा पोटनिवडणुक विजयानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा राज्यसभेचा राजीनामा

● **पुणे । वीरभूमी –** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज दिल्ली दौऱ्यावर गेल्यात. त्या तिथे राज्यसभेच्या सभापतींची भेट घेऊन आज आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. यामुळे आता रिक्त झालेल्या जागेवर कोणाची वर्णी लागतेय याकडे सर्वांच्या नजरा लागून राहील्या आहेत.

सुनेत्रा पवार यांनी नुकत्याच झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत उल्लेखनीय विजय मिळवला. त्यानंतर दोन दिवसांतच त्या दिल्ली दौऱ्यावर गेल्या आहेत. विशेष म्हणजे सुनेत्रा पवार सध्या राज्यसभेच्या सदस्या आहेत. मात्र, एकाच वेळी विधानसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांचे सदस्यत्व ठेवता येत नसल्याने त्या आज राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा देतील, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. दिल्ली दौऱ्यात त्या राज्यसभेच्या सभापतींची भेट घेऊन औपचारिक प्रक्रिया पूर्ण करू शकतात. हा राजीनामा दिल्यास त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेचा मार्ग अधिक स्पष्ट होईल, असे संकेत मिळत होते.

दिल्ली दौऱ्यात त्या राज्यसभेच्या सभापतींची भेट घेऊन औपचारिक प्रक्रिया पूर्ण करू शकतात. हा राजीनामा केवळ तांत्रिक बाब नसून त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेचे दिशादर्शन करणारा ठरू शकतो. विधानसभेतील सक्रिय राजकारणात अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. विशेषत: सुनेत्रा पवार यांच्या रिक्त जागेवर कुणाची नियुक्ती होणार? याची चर्चाही राजकारणात सुरू झाली आहे.

## तूर, हरभरा खरेदीला मुदतवाढ : पणनमंत्री

● **मुंबई । वीरभूमी –** शेतक-यांच्या मागणीची दखल घेऊन केंद्र सरकारने खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत तूर व हरभरा खरेदीसाठी मुदतवाढ जाहीर केली आहे. तूर खरेदीसाठी ३१ मे तर हरभरा खरेदीला २९ मे २०२६ मुदतवाढ देण्यात आली आहे. सोबतच हरभरा खरेदीच्या उद्दिष्टातही वाढ करण्यात आली असून त्यामुळे राज्यातील शेतक-यांना मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या माहितीनुसार केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राज्य शासनाच्या मागणीनुसार तूर खरेदीची मुदत ३१ मे २०२६ पर्यंत तर हरभरा खरेदीची मुदत २९ मे २०२६ पर्यंत वाढवून दिली. तसेच हरभरा खरेदीत ५८ हजार ६३२ मेट्रिक टनांची भर घालण्यात आली असून एकूण उद्दिष्ट आता ८ लाख १९ हजार ८८२ मेट्रिक टनांवर पोहोचले आहे. सुरुवातीला केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेअंतर्गत तूर खरेदीसाठी ९० दिवसांचा तर हरभरा खरेदीसाठी ६० दिवसांचा कालावधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, राज्यातील अनेक शेतकऱ्यांना आपला माल वेळेत विक्रीसाठी आणता आला नसल्याने मुदतवाढीची मागणी जोर धरत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पणन विभागाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा केल्यानंतर मुदतवाढ मिळाली.

किमान हमीभाव योजनेअंतर्गत तूर खरेदीला १ फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात झाली असून आतापर्यंत ३७ हजार ८०१ शेतक-यांकडून ६ लाख ८२ हजार ३७ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे तर हरभरा खरेदीला १ मार्च २०२६ पासून सुरुवात झाली होती. आतापर्यंत ३ लाख ७ हजार ९७३ शेतक-यांकडून ७६ लाख १२ हजार ४९९ क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आला आहे, अशी माहिती पणनमंत्री रावल यांनी दिली.

# पाथर्डी तालुक्यातील मुंगुसवाडे परिसरात गोळीबाराचा प्रयत्न

## हॉटेल मालकावर आरोपीकडून जीवघेणा हल्ला । गावठी कट्ट्यासह जीवंत काडतुसासह आरोपी एका तासात जेरबंद

● **पाथर्डी । वीरभूमी –** गावठी कट्ट्याने गोळीबार करण्याचा प्रयत्न करत तसेच कोयत्याने वार करून हॉटेल मालकाचा खून करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना तालुक्यातील मुंगुसवाडे येथे घडली. या प्रकरणातील मुख्य आरोपीला पाथर्डी पोलिसांनी अवघ्या एका तासात पाठलाग करून अटक केली असून त्याच्याकडून गावठी कट्टा व जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ६ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.४० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी शक्तीमान महादेव खेडकर (वय २४, व्यवसाय - हॉटेल, रा. मुंगुसवाडे, ता. पाथर्डी) हे त्यांच्या हॉटेलमध्ये उपस्थित असताना आरोपी परशुराम मोहन गायकवाड, करण भरत जाधव, विठ्ठल सखाराम लष्करे व इतर दोन अनोळखी इसम स्कॉर्पिओ व ब्रेझा या वाहनांतून तेथे आले.

आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी करत विठ्ठल लष्करे याने पिस्टलमधून गोळी झाडण्याचा प्रयत्न केला. मात्र गोळी न निघाल्याने परशुराम गायकवाड याने कोयत्याने फिर्यादीच्या गळ्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने प्रसंगावधान राखून तो वार चुकवत तेथून पळ काढला. त्यानंतर आरोपींनी हॉटेलमधील साहित्याची तोडफोड करून सुमारे पाच हजार रुपये लंपास केले आणि घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेनंतर फिर्यादीने तत्काळ डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विशाल लहाने व पथकाने तातडीने तपास सुरू केला. आरोपींचा माग काढत पोलिसांनी विठ्ठल सखाराम लष्करे (रा. वाघोली, पुणे; मूळ रा. गांधीनगर, जि. बीड) यास पाठलाग करून अटक केली. त्याच्याकडून एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.

या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ४९१/२०२६ अन्वये बीएनएस २०२३ मधील विविध कलमे तसेच आर्म ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उर्वरित आरोपींच्या शोधासाठी दोन पथके रवाना करण्यात आली आहेत.



घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने हालचाल करत अवघ्या एका तासात आरोपीला अटक केली. या जलद कारवाईमुळे परिसरात गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुक्कमा सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पुजारी, उपनिरीक्षक विशाल लहाने, नितीन दराडे व त्यांच्या पथकाने केली.

# SPOT NEWS

## समर्थ प्रशालेचा गिनीजसह पाच जागतिक विश्वविक्रमात सहभाग

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, माध्यमिक विभागाने शैक्षणिक वर्षात केंद्र व राज्य सरकारच्या गिनिजसह पाच विश्वविक्रमी उपक्रमात सहभाग घेतला. महाराष्ट्रदिनी मान्यवरांच्या हस्ते या विविध उपक्रमांच्या माहिती फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, सचिव सुरेश क्षीरसागर, प्राचार्या वसुधा जोशी, मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी, प्रयोगशाळा परिचर मिलिंद कुलकर्णी आदी उपस्थित होते. वर्षभरातील या उपक्रमांचे समन्वयक म्हणून दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक डॉ. अमोल बागुल यांनी काम पाहिले. संस्थेचे कार्यकारिणी सदस्य व शालेय समिती चेअरमन ड.किशोर देशपांडे यांचे मार्गदर्शन या उपक्रमांना लाभले. यामध्ये १) शिक्षण मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून आयोजित परीक्षा पे चर्चा२०२४-२५ मध्ये प्रशालेचा सहभाग, २) महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था अमृतच्या वतीने दीपावलीनिमित्त दूर्ग बनवा उपक्रम, ३) भारत सरकारच्या प्रौद्योगिकी व इलेक्ट्रॉनिक मंत्रालयाच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय इंडिया-AI समीटमध्ये AI प्रश्नमंजुषा व शपथ उपक्रम, ४) शिक्षण मंत्रालय,भारत सरकारच्या वतीने नॅशनल बुक ट्रस्ट - इंडियाच्या वतीने आयोजित शांतता पुणेकर वाचत आहेत- बुक सेल्फी उपक्रम- वरील चारही संकल्पनांचा गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश व ५)महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या वतीने २६ जानेवारी- प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रप्रथम या देशभक्तीपर गीतांवरील नृत्य कवायत उपक्रम - वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस. या पाच विश्वविक्रमी उपक्रमात सहभाग आहे. संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न केले जातात. अभ्यासाबरोबरच इतर विविध आवडत्या क्षेत्रात संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला हातभार लागतो. गिनीजसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर प्रशालेचे नाव झळकते आहे, ही अभिमानाची व आनंदाची गोष्ट आहे. असे प्रतिपादन संस्थेचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ यांनी केले.

## सोहम रेसिडेन्सी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भिस्तबाग, ढवणवस्ती, तपोवन रोड येथील सोहम रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. यांच्या संचालक मंडळाच्या पदाधिकारी निवडीची सभा नुकतीच उत्साहात पार पडली. निवड प्रक्रियेनुसार चेअरमनपदी किरण साहेबराव म्हस्के, सचिवपदी कविराज चंदर बोटे तर खजिनदारपदी सागर सुनील धर्माधिकारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही सभा निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. सुधीर गणपत शेटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सन २०२६-२०२७ ते २०३१-२०३२ या कालावधीसाठी निवडून आलेल्या संचालक मंडळामधून पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आली. निवड प्रक्रियेदरम्यान चेअरमन, सचिव व खजिनदार या प्रत्येक पदासाठी प्रत्येकी एकच नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाल्याने संबंधित उमेदवारांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. ही प्रक्रिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व संबंधित नियमांच्या अधीन राहून पारदर्शकपणे पार पडल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. निवडीनंतर सर्व पदाधिकाऱ्यांचे सभासदांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी, पारदर्शक कारभारासाठी आणि सभासदांच्या हितासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### पानिपत महाराष्ट्र संपर्क अभियानांतर्गत
# श्रीगोंद्यात रोड मराठा बांधवांचे उत्स्फूर्त स्वागत

**पानिपत वीरांच्या वंशजांचा दौरा । 'पानिपत आणि श्रीगोंदा अतूट नाते' तरुण पिढीने इतिहास जपावा : मराठा राजेश कल्याण**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

अखिल भारतीय मराठा जागृती मंच, पानिपत (हरियाणा) यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या पानिपत महाराष्ट्र संपर्क अभियान अंतर्गत रोड मराठा बांधवांच्या प्रतिनिधी मंडळाचे श्रीगोंदा शहरात उत्स्फूर्त व भावनिक स्वागत करण्यात आले. १७६१ च्या पानिपत युद्धात महाराष्ट्रातून गेलेल्या आणि परत न आलेल्या मराठा वीरांच्या वंशजांनी आपल्या मातृभूमीशी नाते दृढ करण्यासाठी हा दौरा आयोजित केला आहे.

या निमित्ताने श्रीगोंदा नगरपालिकेच्या सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. परिक्रमा इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षा प्रतिभा पाचपुते, नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस, नगरसेवक शहाजी खेतमाळीस, चांदणी खेतमाळीस, मीरा शिंदे, सोनाली गोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पानिपत मंचाचे संस्थापक व कोर कमिटी सदस्य मराठा राजेश कल्याण, मराठा कृषीपाल कसबरे, भागासिंग बाळदे, सुरजीत महाले, कृष्णा कल्याण तसेच राष्ट्रीय समन्वयक मिलिंद पाटील (कोल्हापूर) यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मराठा राजेश कल्याण यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, श्रीगोंदा ही पानिपत वीरांची भूमी असून या इतिहासाचा वारसा तरुण पिढीने जपणे अत्यंत आवश्यक आहे. पानिपत व श्रीगोंदा यांच्यातील ऐतिहासिक नाते अधिक दृढ करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत. या दौऱ्यादरम्यान पानिपत शौर्य दिनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांशी संवाद साधून इतिहासाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच १४ जानेवारी २०२७ रोजी हरियाणातील बस्ताडा (कर्नाल) येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले.



प्रतिनिधी मंडळाने श्रीगोंदा शहरातील ऐतिहासिक स्थळांना भेट दिली. महादजी शिंदे राजवाडा, उत्तर वेस, दिल्ली वेस तसेच सरदार जानराव वाबळे यांच्या समाधीस्थळाला भेट देऊन इतिहासाला अभिवादन करण्यात आले. तसेच म्हातार पिंप्री येथील वाबळे कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांनाही कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले. काष्टी येथील शिवनेरी चौकात सरदार नेताजी पालकर यांचे वंशज गणेशजी पालकर व शरद भोसले यांनी प्रतिनिधींचे स्वागत केले. सीमा पाचपुते यांनी औक्षण करून पाहुण्यांचा सन्मान केला.

या संपूर्ण दौऱ्याचे समन्वयन शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. चंद्रशेखर कळमकर, मारुती वागस्कर, अजित दळवी, सुचित्रा दळवी, संगिता इंगळे, सचिन भोसले, दिगंबर भुजबळ, अमोल बडे, अक्षय गायकवाड, रहीम हवालदार, जालिंदर पाडळे, महेश क्षीरसागर, विठ्ठल ढाणे, अभिजीत भोसले, संकेत नलगे, गणेश कुंदांडे, ईश्वर कोठारे, प्रकाश पोटे यांच्यासह अहिल्यानगर व सातारा जिल्ह्यातील अनेक सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले.

या ऐतिहासिक भेटीमुळे पानिपत आणि श्रीगोंदा यांच्यातील भावनिक व ऐतिहासिक नाते अधिक दृढ झाले असून, भविष्यातही अशा उपक्रमांमधून इतिहासाचे जतन व संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

### राजेश इंगळे यांची नियुक्ती

■ महाराष्ट्र संपर्क अभियानादरम्यान झालेल्या कार्यक्रमात शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांची रोड मराठा पानिपत अहिल्यानगर जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. ही घोषणा राष्ट्रीय मुख्य समन्वयक मिलिंद पाटील यांनी केली. राष्ट्रीय उपाध्यक्ष मराठा राजेश कल्याण यांच्या संमतीने ही निवड जाहीर झाली असून अधिकृत पत्र लवकरच देण्यात येणार आहे. तसेच १४ जानेवारी २०२७ रोजी कर्नाल (हरियाणा) येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे निमंत्रणही देण्यात आले.

## अहमदनगर महाविद्यालयाचे १२ वी बोर्डाच्या परीक्षेत यश

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नुकत्याच झालेल्या इयत्ता बारावीच्या फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. अहमदनगर महाविद्यालयाच्या सायन्स विभागाचा निकाल ९१%, तर कॉमर्स विभागाचा ८५% आणि आर्ट्स विभागाचा ७०% निकाल लागला आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

यामध्ये विज्ञान शाखेत अनुष्का रंजीत सोज्वळ हिने ८०.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. अनुष्का राम भवनानी हिने ८०.३३% आणि मिहीर बेंजामिन गायकवाड याने ७९.८३% गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

वाणिज्य शाखेत अरमान अली सोहेल अली सय्यद याने ८९.१७% गुण मिळवून महाविद्यालयात तसेच वाणिज्य शाखेत प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. तर ध्रुव महेंद्र खैरनार याने ८५% आणि प्राप्ती यशवंत क्षीरसागर हिने ८४.३३% गुण मिळवून वाणिज्य शाखेत अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

कला शाखेत माही इम्रान तांबोळी हिने ८७% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला, तर उर्वशी रामानंद शर्मा हिने ८५.६७% आणि डोरा विक्रम बार्णबस हिने ८४.१७% गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

## दिल्लीगेट येथे १७ मे रोजी उभारली जाणार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार-शिक्षणाची क्रांतिकारी ज्ञानगुढी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या नावाखाली होणारे कर्णकर्कश डीजे, ध्वनीप्रदूषण आणि दिखाऊ शक्तिप्रदर्शन यावर कठोर प्रश्न उपस्थित करत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निरीक्षण नोंदवले आहे. या निरीक्षणाचे पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने स्वागत करण्यात आले असून, त्याला राष्ट्रीय सलामी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर शहरातील दिल्लीगेट परिसरात रविवार, दि. १७ मे रोजी सकाळी १०.३० वाजता ज्ञानगुढी उभारण्याचा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. ही ज्ञानगुढी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित बौद्धिक आणि वैचारिक चळवळीचे प्रतीक असणार आहे.

न्यायालयाच्या खंडपीठातील मा. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके आणि मा. न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांनी आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौद्धिक विकास आणि वंचितांचे उत्थान अधिक प्रिय असते. हे निरीक्षण केवळ न्यायालयीन टिप्पणी नसून आधुनिक भारताच्या सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब असल्याचे मत ॲड. गवळी यांनी व्यक्त केले.

ॲड. गवळी पुढे म्हणाले की, उभारण्यात येणारी ज्ञानगुढी ही डीजे संस्कृती, ध्वनीप्रदूषण, दिखाऊ राजकारण, मानसिक गुलामगिरी, अज्ञान आणि अंधानुकरणाविरोधातील वैचारिक प्रतिकाराचे प्रतीक असेल. ही गुढी विवेक, संविधानिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि बौद्धिक क्रांती यांचे प्रतीक म्हणून उभारली जाणार आहे.

ज्ञानगुढी म्हणजे वाचनालये आणि अभ्यासिकांची प्रेरणा, संविधान वाचनाचा संदेश, विज्ञाननिष्ठ चर्चा, गरीब विद्यार्थ्यांना मदत आणि जातीय मानसिकतेविरुद्ध वैचारिक लढा, असे या उपक्रमाचे स्वरूप असणार आहे. मोठा आवाज म्हणजे मोठा विचार नसतो; डीजे काही तास घुमतो, पण ज्ञान पिढ्यान्पिढ्या घुमत राहते, असा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

# टाहाकारीतील जगदंबा मंदिराच्या शिल्पवैभवाने इतिहासप्रेमी मंत्रमुग्ध

**अकोलकर-संगमनेरकर अभ्यास मंडळाचा 'हेरिटेज वॉक' उपक्रम । मध्ययुगीन स्थापत्याची सखोल माहिती**

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील टाहाकारी येथील मध्ययुगीन जगदंबा मंदिराच्या समृद्ध शिल्पकलेचा वारसा पाहून इतिहासप्रेमी अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. अकोलकर-संगमनेरकर अभ्यास मंडळाच्या वतीने रविवारी (दि. ३) येथे 'हेरिटेज वॉक' (वारसा स्थळांना भेट) या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

इतिहास अभ्यासक प्रा. विठ्ठल शेवाळे हे या उपक्रमाचे आयोजक असून संकल्प प्रमुख व संयोजक म्हणून रमेश थोरात यांनी काम पाहिले. संगमनेर येथील जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल आणि सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालय यांचे या उपक्रमास सहकार्य लाभले.

अकोलकर-संगमनेरकर अभ्यास मंडळाच्या वतीने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी संगमनेर किंवा अकोले तालुक्यातील एखाद्या वारसा स्थळाला भेट देऊन त्याचा इतिहास जाणून घेण्याचा उपक्रम राबविला जातो. मागील महिन्यात संगमनेर येथील सरदार अंभोरकर-देशमुख वाड्याची भेट देण्यात आली होती. स्थानिक इतिहासाचे महत्त्व पटवून देणे आणि पुढील पिढीत इतिहासाची आवड निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

टाहाकारी येथे झालेल्या 'हेरिटेज वॉक'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संगमनेरमधून सुमारे ३० तर अकोलेमधून २० असे एकूण ५० इतिहासप्रेमी या उपक्रमात सहभागी झाले होते.

यावेळी इतिहास अभ्यासक प्रा. विठ्ठल शेवाळे आणि जगदंबा मंदिर अभ्यासक डॉ. उल्हास कुलकर्णी यांनी मंदिराच्या स्थापत्यशास्त्राची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, चालुक्यकालीन या मंदिराची रचना तारकाकृती (बहुकोनी) असून ती भूमिज-लतिन शैलीतील शुष्कसंधी प्रकारात मोडते. मंदिरात मुखमंडप, मंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशी रचना असून वितान (छत), देवकोष्ठे, मातृका शिल्पे, कामशिल्पे, शिखर, कीर्तीमुख तसेच बाह्यभिंतीवरील सुरसुंदरींची शिल्पे यांचा उत्कृष्ट संगम आढळतो.



बाह्यभिंतीवरील कामशिल्पे (मैथुन शिल्पे) तसेच मुख्य मंडपातील 'मातृका' शिल्पांचे स्पष्टीकरण करताना त्यांनी सांगितले की, देवीच्या दर्शनासाठी येताना मनातील विकार नाहीसे होऊन मन शुद्ध व निर्विकार व्हावे, असा सूचक संदेश या शिल्पांमधून दिला आहे. शिल्पांवरील ऊन-सावल्यांचा खेळ आणि त्यातून निर्माण होणारी जिवंतता ही या स्थापत्याची वैशिष्ट्ये असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी जगदंबा मंदिर ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष अण्णासाहेब एखंडे व विश्वस्त भाऊसाहेब एखंडे (तात्या) यांनी उपस्थितांना अल्पोपहार देऊन आभार मानले.

SPOT NEWS

## अहिल्यानगर येथे ॲलेक्स कपच्या ८ व्या पर्वाला उत्साहात प्रारंभ

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

फिरोदिया शिवाजियन्स, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (ए.डी.एफ.ए.) आणि फर्नांडिस परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ॲलेक्स कप या फुटबॉल स्पर्धेच्या ८ व्या पर्वाला नुकतेच प्रारंभ झाले. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे संयुक्त सचिव प्रदीप जाधव यांच्या हस्ते तसेच कार्यकारिणी सदस्य राजेंद्र पाटोळे आणि पल्लवी सैंदाणे यांच्या उपस्थित करण्यात आले. यावेळी फिरोदिया शिवाजियन्सच्या गेल्या ३५ वर्षांपासूनच्या जर्सी रंगांचे प्रतीक असलेल्या लाल आणि पांढऱ्या फुगे आकाशात सोडून उद्घाटन करण्यात आले. ही स्पर्धा स्वर्गीय ॲलेक्स फर्नांडिस उर्फ बाबा यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येत असून, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या स्थापनेपासून सलग ४५ वर्षे त्यांनी संस्थापक सचिव म्हणून काम पाहिले. अहमदनगर जिल्ह्यात फुटबॉलच्या विकासासाठी त्यांचे योगदान अतुलनीय असून ते कायम स्मरणात राहणार आहे. त्यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा घेतली जात आहे. यंदाच्या स्पर्धेत एकूण १० संघ सहभागी झाले असून, अंतिम सामना ९ मे २०२६ रोजी खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी फिरोदिया शिवाजियन्सच्या कोअर कमिटी सदस्यांमध्ये अभिषेक सोनावणे, पल्लवी सैंदाणे, सचिन पात्रे, जेव्हिअर स्वामी आणि राजेश अँथनी परिश्रम घेत आहेत.

# पिक विमा न मिळाल्यास तीव्र आंदोलन

### अकोलेतील आदिवासी शेतकरी आक्रमक । अतीवृष्टीमुळे नुकसान होऊनही मदत प्रलंबित

**● अकोले । वीरभूमी –**

खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये अतीवृष्टी व वादळी पावसामुळे भात व सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही अद्याप पिक विमा व अनुदान न मिळाल्याने अकोले तालुक्यातील आदिवासी शेतकरी संतप्त झाले आहेत. तालुका कृषी अधिकारी व तहसीलदार यांच्याकडे वारंवार निवेदन देऊनही केवळ आश्वासने मिळत असल्याने शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.



वारंघुशी, बारी, पेंडशेत, मान्हेरे, वाकी, रंधा आदी गावांतील शेतकऱ्यांनी समाजसेवक अनंत महादू घाणे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कृषी अधिकारी, अहिल्यानगर यांना निवेदन सादर केले. यावेळी अध्यक्ष भरत घाणे, सरपंच तुकाराम खाडे, मारुती खाडे, राजू भवारी, देविदास भागडे, प्रकाश कोरडे, रविराज पोपेरे, मारुती मुठे, राघू खोले, सचिन झाबांडे, सोनाजी भोईर, सुनील पवार आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोयाबीन पिक विम्यासाठी केलेले अनेक अर्ज विमा कंपन्यांकडून नाकारण्यात आल्याबद्दल शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आमची नावे कोणत्या निकषांवर बाद केली? असा सवाल उपस्थित करत रिजेक्ट केलेल्या अर्जांची यादी तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली. तसेच २०२४ मधील भात पिक विमा अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्याबद्दल संताप व्यक्त करत तो त्वरित वर्ग करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

आदिवासी भागातील अनेक शेतकऱ्यांनी शेतीसाठी उसने पैसे घेतले, सोने तारण ठेवले किंवा उधारीवर साहित्य घेतले आहे. मात्र अनुदान न मिळाल्याने व्याजाचा बोजा वाढत असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे शेततळे, ट्रॅक्टर, पावर टिलर, रोटर आदींसाठी मंजूर झालेली थकीत अनुदाने तातडीने देण्यात यावीत, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक जाधव यांच्यासोबत सविस्तर चर्चा झाली. तसेच मुंबई येथील पिक विमा प्रतिनिधींशी दूरध्वनीवर संवाद साधण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले.

मात्र, आता आश्वासन नको, प्रत्यक्षात न्याय हवा, असा ठाम पवित्रा घेत शेतकऱ्यांनी इशारा दिला की, मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास उपोषण, रास्ता रोको आणि तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल.

## ओंकार उद्योगसमूहावरील ऊस बिलांबाबतच्या अफवा निराधार

**शेतकरी, कामगार व वाहतूकदारांना वेळेत देयके दिल्याचा दावा । सोशल मीडियावर दिशाभूल करणारी माहिती**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

राज्यातील शेतकऱ्यांना अधिक दर देणारा उद्योगसमूह म्हणून ओळख असलेल्या ओंकार साखर उद्योगसमूहाने आपल्या कार्यप्रणालीबाबत स्पष्ट भूमिका मांडत सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या अफवा निराधार असल्याचे म्हटले आहे. ऊस बिलांबाबत हजारो कोटींची थकबाकी असल्याच्या चर्चांना फेटाळून लावत, शेतकरी, कामगार व वाहतूकदारांना वेळेत देयके दिल्याचा दावा समूहाने केला आहे.



समूहामार्फत सध्या राज्यात १७ साखर कारखाने कार्यरत असून कर्नाटक, तेलंगणा व उत्तर प्रदेशमध्येही कारखाने चालवले जात आहेत. चालू गळीत हंगामात सुमारे ७५ लाख टन गाळप झाले असून ते १ कोटी टनांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. सुमारे १८ हजार कामगार, लाखो चालक व कर्मचारी तसेच ८ लाख शेतकरी या उद्योगाशी जोडलेले असल्याची माहिती देण्यात आली.

मा. बाबुराव बोत्रे पाटील यांच्या नेतृत्वाखाली बंद पडलेले अनेक कारखाने पुन्हा सुरू करण्यात आले असून काटेकोर नियोजनाच्या जोरावर देयकांची नियमित पूर्तता करण्यात आल्याचा दावा करण्यात आला.

राज्यातील १४० साखर कारखान्यांकडे १५ जानेवारीनंतरचे सुमारे २१०० कोटी रुपयांचे एफआरपी प्रलंबित असताना, ओंकार उद्योगसमूहाने आपल्या १७ कारखान्यांतून आतापर्यंत १८३० कोटी रुपये शेतकऱ्यांना अदा केल्याचे सांगण्यात आले. तसेच वाहतूकदारांना सुमारे ७१० कोटी रुपये देण्यात आले आहेत. चालू हंगामात समूहाची उलाढाल सुमारे ६ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असून, पुढील वर्षी ती ७ हजार कोटी रुपयांपर्यंत जाण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करून उद्योगसमूहाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला. अशा प्रकारांबाबत राज्यभरात गुन्हे दाखल करण्यात आले असून संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याचे ओमराजे बोत्रे पाटील यांनी सांगितले. शेतकरी, कामगार व वाहतूकदारांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी संबंधित कारखान्यांशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले.

### बदनामीविरोधात कारवाई

■ सोशल मीडियावर दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्याप्रकरणी रविराज साबळे पाटील यांच्याविरोधात विविध ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्या विरोधात अब्रूनुकसानीचा दावा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

### इथेनॉल धोरणाचा परिणाम

■ केंद्र सरकारच्या नव्या धोरणानुसार पेट्रोल-डिझेलमध्ये ३३ टक्के इथेनॉल मिश्रणामुळे इथेनॉल व मोलॅसिसची विक्री प्रलंबित आहे. त्यामुळे सुमारे ६०० कोटी रुपये येणे बाकी असून, ऊस देयकांच्या अदा करण्यात सुमारे एका महिन्याचा विलंब झाला आहे. मात्र, पुढील आठवड्यात सर्व देयके पूर्ण करण्यात येतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## अकोलेत युवासेनेच्या बैठकीत शिवसेना प्रवक्ते राहुल लोंढे यांचा सत्कार

**● अकोले । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे बाळासाहेबांच्या शिवसेना पक्षाचे प्रवक्ते तथा पालघर जिल्हा संपर्क प्रमुख राहुल लोंढे यांचा तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यानंतर युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठकही पार पडली.



या प्रसंगी शिवसेना पक्षाचे जिल्हा समन्वयक बाळासाहेब भोर, तालुका अध्यक्ष सुशांत गजे, कार्याध्यक्ष जगन देशमुख आदी उपस्थित होते.

बैठकीत राहुल लोंढे यांनी तालुक्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेत पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. युवासेनेचे काम जिल्हा व तालुका पातळीवर अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत शिर्डी मतदारसंघातून बाळासाहेबांच्या विचारांचा खासदार निवडून यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हा समन्वयक बाळासाहेब भोर यांनी जिल्ह्यातील पक्षाच्या कामकाजाची माहिती दिली. पक्ष विभाजनानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अनेक नागरिकांनी शिवसेना पक्षात प्रवेश केल्याचे त्यांनी सांगितले.

भविष्यात अकोले तालुक्यात बाळासाहेबांच्या विचारांचा आमदार निवडून येईल, असा विश्वास कार्याध्यक्ष जगनशेठ देशमुख यांनी व्यक्त केला.

बैठकीदरम्यान शिवसेनेचे जावेद जहागिरदार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी योगेश रूपवते, शंकर संगारे, जगनशेठ देशमुख, बाळासाहेब भोर, सुशांत गजे, मुकुंदा भोर, महेश देशमुख, जावेदशेठ जहागिरदार, सागर जगताप, राजेंद्र नाईकवाडी, प्रकाश पाचपुते, सचिन शेटे, विशाल शेणकर, यशराज देशमुख, सोमनाथ नवले, मंगेश बाळसराफ, सचिन भालेराव कपिले आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाथर्डी शहरात डुकरांचा सुळसुळाट, कचरा व दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त

### धामणगाव देवी रस्ता, वनदेव परिसर, बाजारतळासह अनेक भागांमध्ये अस्वच्छता । प्रशासनाकडे नागरिकांचा आक्रोश

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहरामध्ये पुन्हा डुकरांचा सुळसुळाट झाला असून सडक्या, कुजक्या अन्नपदार्थांसह ओल्या कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. उपनगरांमध्येही हीच समस्या पुन्हा डोके वर काढत आहे.

शहरातील हजारो नागरिक सकाळ-सायंकाळ धामणगाव देवी रस्त्याने फिरण्यासाठी जातात. मोकळी हवा, प्रदूषण नाही आणि तुलनेने कमी वाहतूक असल्याने अनेकांची पसंती धामणगाव रस्ता व वनदेव परिसराला आहे. संस्कार भवन चौकातून वनदेव रस्त्याकडे जाताना पहिल्या बोळीपासूनच समोरच्या बाजूला बांधकाम सुरू असलेल्या कॉम्प्लेक्सच्या उघड्या जागेवर परिसरातील नागरिकांकडून कचरा टाकला जातो.

यामध्ये काही व्यावसायिकांचाही कचरा टाकला जातो. सडके-कुजके अन्नपदार्थ व फळे येथे टाकल्याने वाऱ्याच्या दिशेनुसार ती दुर्गंधी परिसरात पसरते. काही व्यावसायिक व रहिवासी कचरा कॅरीबॅगमध्ये भरून टाकतात. या कचऱ्यावर भटकी जनावरे, कुत्रे व डुकरे लगेचच धावतात. फुटलेल्या पिशव्या घेऊन डुकरे इतरत्र पळतात आणि घाण सर्वत्र रस्त्यावर पसरते.

खाण्याच्या रिकाम्या पुड्या, पाण्याच्या बाटल्या, बिअर व दारूच्या रिकाम्या बाटल्याही या भागात आढळतात. महादेव मंदिरासमोरील गाव तलाव परिसरही कचऱ्याला अपवाद नाही. शहरात दुकाने उघडल्यानंतर मेन रोडवरील कचरा उचलणारी वाहने येईपर्यंत भटकी जनावरे कचरा पांगवतात.

परिसरातील रहिवासी व व्यावसायिक मोठ्या दुकानांच्या बाजूच्या कोपऱ्यावर कचरा टाकतात. रस्त्याच्या कडेला व्यवसाय करणारे बहुसंख्य व्यावसायिक आपला कचरा रस्त्यावर किंवा गटारांमध्ये टाकतात.



उन्हाळ्यामुळे दुर्गंधी लवकर पसरते. दोन्ही बसस्थानक परिसरातील गटारांची अवस्था म्हणजे कचऱ्यात गटार की गटारात कचरा अशी झाली आहे.

याच घाणीमध्ये अनेक खाद्यपदार्थ विक्रेते ग्राहकांना पदार्थ पुरवतात. अंबा मार्केट रस्त्यावर भरत असल्याने खराब आंबे, सालपटे व कोया रस्त्यावरच टाकल्या जातात. त्या खाण्यासाठी भटकी जनावरे तेथे धडपड करतात. काही डुकरे गर्दीच्या वेळी आंब्याच्या पाटीत तोंड घालतात. नाकातून घाण स्त्राव येणारी भटकी जनावरे भाजीपाला व फळांमध्ये तोंड घालतात. यामुळे अनेक ग्राहक माल घेण्यास तयार नसतात.

रस्त्याच्या कडेला असणाऱ्या प्रत्येक व्यावसायिक व विक्रेत्याला छोटी कचराकुंडी (डस्टबिन) सक्तीची करावी, तसेच सायंकाळी घंटागाडी नियमित फिरवावी, अशी मागणी होत आहे. त्यामुळे कचरा योग्यरीत्या गोळा होऊ शकेल.

चहा विक्रेत्यांचे कागदी कप खाण्यासाठी भटकी जनावरे व डुकरे दिवसभर फिरतात. कागदी कपांना बंदी असूनही त्याचा सर्रास वापर सुरू आहे. काही भटकी कुत्री डुकराची पिले, मृत पक्षी किंवा मांसाचे तुकडे खाऊन हिंस्र बनली असून एकट्या व्यक्तीवर धाव घेतात. बाजारतळ, आखर भाग, प्रमुख उपनगर, खेरडा रस्ता, रामगिरी बाबा मार्ग या भागांत कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात आहे.

बाजारतळ परिसरात भटकी जनावरे, कुत्रे, डुकरे आणि दिवसेंदिवस वाढणारी अतिक्रमणे यामुळे चालण्यासाठीही जागा उरलेली नाही. राजुरी-शिर्डी हा नवा मार्ग पाथर्डी शहरातून विकसित झाल्याने बीड जिल्ह्यातून येणारी वाहतूक उपजिल्हा रुग्णालय मार्गे वाढली आहे. त्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत असून, रस्त्याच्या मधोमध वाहने लावली जातात. यावर नियंत्रण नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

सामान्य नागरिक बोलत नाहीत, आणि बोलणाऱ्यांचे प्रशासन ऐकत नाही, अशी भावना निर्माण झाली आहे. किरकोळ व अनैतिक गुन्हेगारी वाढीस या परिस्थितीचा हातभार लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

पाथर्डी शहरात पोलीस स्टेशन आहे याची जाणीव शहरवासीयांना अलीकडच्या दोन-तीन दिवसांत पोलिसांच्या वावरामुळे झाली आहे. अनेक सीसीटीव्ही बंद असले तरी काही कार्यरत आहेत. त्यात कैद झालेले गुन्हेगार कधी सापडणार, असा प्रश्न लुटल्या गेलेल्या नागरिकांकडून विचारला जात आहे.

तुमचं काही देऊ नका, पण निसर्गाने दिलेली शुद्ध हवा, पाणी व झाडी तरी नागरिकांसाठी राहू द्या, अशी आर्त हाक नागरिक देत आहेत. पाच वर्षांसाठी दिलेल्या आश्वासनांमुळे आता स्वतःलाच मार्ग शोधावा लागेल, अशी मानसिकता नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. यामुळे शहरात विश्वासाचे वातावरण बिघडत असून 'सब घोडे बारा टक्के' अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# दूषित पाणीपुरवठ्यामुळे पाथर्डीकरांचे आरोग्य धोक्यात

## जायकवाडी योजनेतील पाणी काळसर, पिवळसर व दुर्गंधीयुक्त । जलशुद्धीकरण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

**● पाथर्डी । वीरभूमी –**
जायकवाडी योजनेच्या माध्यमातून पाथर्डी शहराला पिण्यासाठी होणारा पाणीपुरवठा अत्यंत दूषित, दुर्गंधीयुक्त, काळसर व पिवळसर रंगाचा होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या परिस्थितीमुळे साथरोगांचा फैलाव सुरू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शहराला चार ते पाच दिवसांच्या अंतराने नळावाटे पिण्याचे पाणी मिळते. मात्र गेल्या काही दिवसांपासून नळातून येणारे पाणी कुबट वासाचे असून सुरुवातीला गाळमिश्रित आणि त्यानंतर पिवळसर रंगाचे पाणी येत आहे. पाण्यावर जंतुनाशक औषधांचा प्रभाव जाणवत नसल्याने जलशुद्धीकरण होते म्हणजे नेमके काय? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

दूषित पाणी आणि कृत्रिमरीत्या पिकवलेल्या आंब्यांच्या सेवनामुळे पोटदुखी, पित्ताचे विकार, सर्दी, खोकला, अंगदुखी आणि अपचन यांसारखे त्रास मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. याचा सर्वाधिक परिणाम लहान मुले व वयोवृद्ध नागरिकांवर होत असल्याचे दिसून येत आहे.

शेवगाव-पाथर्डी नळ योजनेला जायकवाडी धरणातून दहिफळ येथील जॅकवेलच्या माध्यमातून पाणी मिळते. हे पाणी शेवगाव तालुक्यातील खंडोबा माळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात नेले जाते. तेथे प्रक्रिया करून पाणी अमरापूरच्या टाकीत आणि तेथून शहरातील टाक्यांमध्ये पोहोचते. त्यानंतर ग्रामीण भागासाठीही याच पाण्याचा पुरवठा सुरू होतो. धरणातून उचललेले पाणी शहरातील साठवण टाक्यांपर्यंत कसे पोहोचते, हा आता अभ्यासाचा विषय ठरावा अशी प्रतिक्रिया नागरिकांमध्ये उमटत आहे.

पूर्वी पालिकेकडून पाण्याच्या नमुन्यांची तपासणी महिन्यातून किमान तीन वेळा केली जात असे. मात्र सध्या नमुना तपासणी कधी झाली आणि त्याचा अहवाल काय आला, याबाबत नागरिक अनभिज्ञ आहेत. पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकातही अनियमितता निर्माण झाली असून काही प्रभागांमध्ये पाणी कधी सोडले जाणार याची माहिती व्हॉट्सप ग्रुपमधून दिली जात असे, ती सेवाही आता नियमित मिळत नसल्याची तक्रार आहे.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पाण्याची मागणी वाढली असताना दूषित पाण्यामुळे जार पाण्याच्या विक्रेत्यांना मात्र सुगीचे दिवस आले आहेत. लग्नसमारंभ व घरगुती वापरासाठी जार पाण्याची मागणी वाढली आहे. तर पाण्याचे निश्चित वेळापत्रक नसल्याने अनेक नागरिक बोअरवेलच्या पाण्यावर अवलंबून राहत आहेत, जे बहुतेक ठिकाणी पिण्यास अयोग्य आहे. नियमित पाणीपट्टी भरणाऱ्या नागरिकांना शुद्ध पाण्याऐवजी दूषित पाणी मिळणे म्हणजे जीवनमरणाचा प्रश्न असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. काही प्रभागांतील नागरिकांनी पाण्याचे नमुने भरून पालिका प्रशासनाला दाखवले असून लोकप्रतिनिधींनाही परिस्थितीची माहिती देण्यात आली आहे. अशा परिस्थितीत सामान्य माणसाने पाण्यासाठी जगावे की मरावे, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.



पालिकाप्रशासनाच्याम्हणण्यानुसार भूमिगत गटार कामादरम्यान काही पाईप डॅमेज झाल्यामुळे दूषित पाणीपुरवठा होत असावा. मात्र या समस्येकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. दरम्यान, शहरातील रुग्णालयांमध्ये पोटाचे विकार, सर्दी-खोकला आणि इतर आजारांच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाली असून खाजगी दवाखाने रुग्णांनी ओसंडून वाहत आहेत.

शहरातील नागरिकांनी तातडीने शुद्ध, सुरक्षित आणि नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

# जातेगाव ग्रामपंचायतीची ‘समृद्ध पंचायतराज अभियान’ अंतर्गत पाहणी

**● पारनेर । वीरभूमी–**
पारनेर तालुक्यातील मौजे जातेगाव येथे ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या वरिष्ठ समितीने ग्रामपंचायतीची सखोल पाहणी केली. गावातील सर्वांगीण विकासाचा आढावा घेत असताना शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि कामांचा दर्जा पाहून समितीने प्रशासकीय कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.



तपासणी समितीने गावातील विविध विकासकामांची केवळ कागदोपत्री नव्हे, तर प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. यामध्ये प्रामुख्याने सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची सद्यस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जलजीवन मिशनची अंमलबजावणी, रस्ते विकास, सौर ऊर्जा प्रकल्प तसेच सार्वजनिक वास्तूंची देखभाल यांचा समावेश होता.

तसेच अंगणवाडी सेवा, शैक्षणिक सुविधा आणि ग्रामस्थांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांचाही आढावा घेण्यात आला. नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आलेल्या या कामांमुळे गावात सकारात्मक बदल घडून आल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

ग्रामपंचायत ग्रामसेवक राजू विधाते यांनी जातेगावमध्ये राबविण्यात आलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती समितीसमोर सादर केली. शासकीय निधीचा योग्य वापर, कामांतील पारदर्शकता आणि स्थानिक पातळीवरील उत्कृष्ट नियोजनामुळे गाव विकासाच्या मुख्य प्रवाहात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या सादरीकरणामुळे समितीला गावच्या प्रगतीचा नेमका आराखडा समजून घेण्यास मदत झाली.

या पाहणी दौऱ्यावेळी पारनेरचे विस्तार अधिकारी मेहेत्रे साहेब, गटविकास अधिकारी औधा नवनाथ यांच्यासह तपासणी समितीचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच प्रशासक संजय गायकवाड, कारभारी पोटघन आणि पत्रकार विशाल फटांगडे यांनीही सहभाग नोंदवला.

याप्रसंगी अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. लोकसहभाग आणि प्रशासकीय इच्छाशक्ती यांच्या जोरावर जातेगावने ‘समृद्ध पंचायतराज’ संकल्पना प्रत्यक्षात उतरविल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. समितीने कामाच्या गुणवत्तेबाबत सकारात्मक अहवाल दिल्याने तालुक्यात जातेगाव ग्रामपंचायतीचे कौतुक होत आहे.

# आ. आशुतोष काळेंच्या पाठपुराव्याने वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र श्रीरामपूर, कोपरगावसह इतर चार तालुक्यात मिळणार

**● कोपरगाव । वीरभूमी–**
मागील सहा वर्षात कोपरगाव विधानसभा मतदार संघातील दिव्यांग बांधवांसाठी देवदूत ठरलेले व जवळपास दीड हजाराच्यावर दिव्यागांना विनासायास दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून देणाऱ्या आमदार आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्याची आरोग्य विभागाने अखेर दखल घेतली असून यापुढे कोपरगाव मतदार संघातील दिव्यांग बांधवांना दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी श्रीरामपूरलाच वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे कोपरगावसह इतरही चार तालुक्याच्या दिव्यांग बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.

> मतदार संघातील सर्वच दिव्यांग बांधवांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी एकही दिव्यांग व्यक्ती दिव्यांग पत्रापासून वंचित राहणार नाही हा माझा प्रयत्न असून त्याचबरोबर दिव्यांग व्यक्ती व त्यांचे पालक यांना वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी कमीत कमी वेळात कसे मिळवून देता येईल या उद्देशातून दिव्यागांचा प्रवासाचा निम्मा त्रास कमी करण्यात यश मिळाले आहे. कोपरगाव उपजिल्हा रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर असून दिव्यागांना येत्या काही महिन्यात कोपरगावच्या उपजिल्हा रुग्णालयातच वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून देणार आहे.
>
> **– आ. आशुतोष काळे**

कोपरगाव मतदार संघातील दिव्यांगांना व त्यांच्या नातेवाईकांना वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी होणारा त्रास वाचविण्यासाठी प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सन्मानाने हक्काचे वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून द्यायचेच हा निश्चय करून आमदार आशुतोष काळे यांनी २०१९ पासून निवडून येताच दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी कोपरगाव येथून जिल्हा रुग्णालयात जाण्यासाठी मोफत बससेवा आणि त्यांना मदत करण्यासाठी आपल्या संपर्क कार्यालयाची यंत्रणा उभी केलेली आहे. हा सामाजिक उपक्रम आजतागायत सुरु असून त्याबाबत नियमितपणे सोशल मिडीयाच्या माध्यमातून जनजागृती करून मतदार संघातील एकही दिव्यांग शासनाच्या अधिकृत दिव्यांग प्रमाणपत्रापासून वंचित राहणार नाही हा त्यांचा प्रयत्न आहे.

त्याचबरोबर कोपरगाव पासून जवळपास १०० किलोमीटर पेक्षा जास्त दूरवर असणाऱ्या अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात दिव्यांग तपासणीसाठी दिव्यांग व त्यांच्या पालकांना होणारा त्रास कमी व्हावा यासाठी शिर्डी, राहाता, श्रीरामपूर याठिकाणी कोपरगाव तालुक्यासह जिल्ह्याच्या उत्तरेच्या तालुक्यातील दिव्यांग रुग्णांची तपासणी होवून त्यांना तिथेच वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळावे याबाबत आमदार आशुतोष काळे यांचा आरोग्यविभागाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु होता व ही अडचण त्यांनी पालकमंत्र्यांकडे देखील मांडली होती. अखेर पाठपुरावा फळाला आला असून पुढील महिन्यापासून दिव्यांग बांधवांना तपासणीसाठी व वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालयात जाण्याची गरज नाही. यापुढे श्रीरामपूर येथील उपजिल्हा रुग्णालयस्तरावरील ग्रामीण रुग्णालयात दिव्यांगांची तपासणी करून त्यांना वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे.

त्यामुळे अकोले ते अहिल्यानगर १२७, त्यानंतर संगमनेर ते अहिल्यानगर १०७, कोपरगाव ते अहिल्यानगर १००, राहाता ते अहिल्यानगर ८० व श्रीरामपूर ते अहिल्यानगर ६७ किलोमीटरचे अंतर आहे. श्रीरामपूर तालुका वगळता इतर कोपरगाव, राहाता, संगमनेर, अकोले या तालुक्यातून अहिल्यानगर जाण्याचा प्रवासाचा त्रास जवळपास निम्याने कमी होवून वेळ देखील वाचणार आहे. त्यामुळे दिव्यांग बांधवांनी विशेषत: त्यांच्या पालकांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.कोपरगाव तालुक्यासह श्रीरामपूर,राहाता,संगमनेर व अकोले तालुक्यातील दिव्यांग बांधवांची दूरवर जाण्याची अडचण कमी केल्यामुळे आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.श्रीम.सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे, आरोग्यमंत्री ना.प्रकाशजी आबिटकर, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांचे दिव्यांग बांधव व त्यांच्या पालकांच्या वतीने आभार मानले आहे.


# अकोले शहरात आनंदगड शैक्षणिक संकुलाचे प्रवेश मार्गदर्शन केंद्र सुरु

## विद्यार्थी व पालकांसाठी करिअर निवडीसाठी मार्गदर्शन । विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला वेग

**● अकोले । वीरभूमी–**
आंतरभारती रूरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित आनंदगड शैक्षणिक संकुलाचे विविध अभ्यासक्रमांसाठी (पॉलिटेक्निक, फार्मसी, ॲक्युपंक्चर, इंग्लिश मिडियम) प्रवेश मार्गदर्शन केंद्र अकोले, जि. अहिल्यानगर (बाजारतळा शेजारी) येथे सुरू करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे यांनी दिली.

अकोले-संगमनेर तालुक्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था असलेल्या आनंदगड शैक्षणिक संकुलात धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनियर कॉलेज, आनंद गुरुकुल वसतिगृह, मातोश्री राधा फार्मसी कॉलेज, आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज आणि मातोश्री गंगूबाई शिंदे अक्युपंक्चर कॉलेज या अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे प्रवेश सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शालेय प्रवेश तसेच इयत्ता १० वी व १२ वी नंतर योग्य अभ्यासक्रम निवडीसाठी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे.





या केंद्रात ऑनलाइन प्रवेश फॉर्म भरण्यासाठी संगणकाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच विविध शाखांचे महत्त्व समजावून सांगणारे व्हिडिओ दाखविण्यासाठी इंटरॅक्टिव्ह पॅनलचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

इयत्ता १० वी नंतर कमी कालावधीत रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन पॉलिटेक्निकमधील सिव्हिल इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग या शाखांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे, शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या संधी याबाबतही माहिती दिली जाईल.

तसेच इयत्ता १२ वी नंतर डी. फार्मसी, बी. फार्मसी आणि ॲक्युपंक्चर थेरपी या अभ्यासक्रमांसंदर्भातही सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. १० वी, १२ वी (सायन्स) तसेच आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी योग्य अभ्यासक्रमाची निवड करून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुलातील अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन संस्थापक सचिव डॉ. अनिल रहाणे, संचालिका सौ. सुप्रिया वाकचौरे, सौ. गीता रहाणे, शिवराज वाकचौरे, अक्षय रहाणे, प्राचार्य किरण चौधरी, प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, प्रा. प्राजक्ता आंबरे-सावंत आणि समन्वयक प्रा. विद्याचंद्र सातपुते यांनी केले आहे.

### उद्योजक डावरे यांचेकडून संस्थेचे कौतुक

■ उद्योजक माणिकराव डावरे यांनी या प्रवेश मार्गदर्शन केंद्रास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना १० वी, १२ वी नंतर काय? या प्रश्नाचे मार्गदर्शन करणाऱ्या अशा केंद्राची आवश्यकता असल्याचे सांगितले. ही गरज ओळखून आनंदगड शैक्षणिक संकुलाचे संस्थापक रावसाहेब वाकचौरे व डॉ. अनिल रहाणे यांनी अकोले शहराच्या मध्यवर्ती भागात हे केंद्र सुरू केल्याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन केले. या केंद्राचा विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी शुभेच्छा दिल्या.